रयत शिक्षण संस्थेचे,

# आर्टस, सायन्स अँण्ड कॉमर्स कॉलेज, रामानंदनगर (बुर्ली)

## ता. पलूस, जि. सांगली

दिनांक : 23 ऑगस्ट 2019

## राष्ट्रीय सेवा योजना

### पूरग्रस्त बुर्ली गावातील स्वच्छता कार्यक्रम

मौजे बुर्ली ता पलूस, जि. सांगली या पूरग्रस्त गावातील जिल्हा परिषद शाळा परिसर महाविद्यालयातील एन.एस.एस.च्या विद्यार्थ्यांनी स्वच्छ केला. यावेळी शाळेचे प्रांगण, वर्गखोल्या, वरांडा गाळमुक्त करण्यात आल्या. स्वच्छतेदरम्यान महापुराच्या पाण्यासोबत आलेला कचरा, पॅस्टिकच्या पिशव्या, टाकाऊ सामान व आवारात साठलेला गाळ काढण्यात आला. सदर गाळ ट्रक्टर-ट्रॉलीच्या सहाय्याने काढण्यात आला.

यावेळी शाळेत उपस्थित असणाऱ्या विद्यार्थ्यांना परिसर स्वच्छता व आरोग्याच्या दृष्टीने स्वच्छतेचे महत्त्व पटवून देण्यात आले. पिण्याच्या पाण्याबाबत पाळावयाच्या पथ्यांबाबत विशेष काळजी घेण्याबाबत सूचना करण्यात आल्या.

**निष्पत्ती (Outcome)**

- मौजे बुर्ली येथील जि.प. शाळेचा परिसर स्वच्छ झाला.
- विद्यार्थ्यांना शाळेत बसण्यासाठी स्वच्छ वर्गखोल्या उपलब्ध झाल्या.
- विद्यार्थ्यांना स्वच्छतेचे महत्त्व कळाले.

लाभार्थी : 125 विद्यार्थी व शिक्षक





कार्यक्रम अधिकारी
राष्ट्रीय सेवा योजना

प्राचार्य,
आर्टस, सायन्स अँण्ड कॉमर्स कॉलेज रामानंदनगर (बुर्ली)

स्थापना : दिनांक २०/०१/१९२२





* पर्यावरण संतुलित समृध्द ग्राम, निर्मल ग्राम, बिमा ग्राम, महात्मा गांधी तंटामुक्त गाव *

# ग्रामपंचायत बुर्ली



ता. पलूस, जि. सांगली (महाराष्ट्र) फोन : (०२३४६) २२०५०० Email : vpburli2011@gmail.com,

- ग्रामपंचायत कराची रक्कम मुदतीत भरुन सहकार्य करावे.
- पाणी म्हणजे जीवन, पाणी जपून वापरा.
- आपले घर व परिसर स्वच्छ ठेवा.
- झाडे लावा, झाडे जगवा.
- स्थानिक जन्म-मृत्यूची नोंद २१ दिवसाच्या आत ग्रामपंचायतीकडे करणे अनिवार्य आहे.
- प्लास्टिकचा वापर करु नका.
- कचरा कचराकुंडीतच टाकावा.
- मुलगी वाचवा, देश वाचवा.

जावक क्र. : 　　　　　　　　　　दिनांक : २५ / ९ /२०१९

## दाखला

सरपंच / ग्रामविकास अधिकारी हे,

ग्रामपंचायत बुर्ली ता. पलूस यांचेकडून दाखला देणेत येतो की, मौजे बुर्ली येथे सन २०१९-२० च्या ऑगस्ट महिन्यातील आलेल्या महापूराच्या वेळी व त्यानंतरच्या कालावधीत रामानंदनगर (बुर्ली) येथील आर्ट्स, सायन्स, ॲण्ड कॉमर्स कॉलेजच्या शिक्षक, शिक्षकेतर, एन.एस.एस. स्वयंसेवक व एन. सी. सी. छात्र, कॉलेजचे विद्यार्थी - विद्यार्थिनी यांनी बुर्ली गावामध्ये महापूराने बाधित परिसर, समाजमंदिर, प्राथमिक शाळा परिसर गावातील मुख्य रस्ता तसेच गावातील हायस्कूल व गल्लीमधून गावचे सरपंच, ग्रामपंचायत सदस्य आणि ग्रामस्थांच्या समवेत स्वच्छता केली. म्हणूनसाठी हा दाखला दिला असे.

ग्रामविकास अधिकारी 　　 सरपंच

ग्रामपंचायत बुर्ली, ता. पलूस जि सांगली

ग्रामपंचायत बुर्ली, स्थापना दि. २०/०१/१९२२, ता. पलूस, जि. सांगली

जि.प. शाळा नं. २ बुर्ली ता. पलूस जि. सांगली

दाखला दि. २५/८/२०१९

मा. मुख्याध्यापक
जि.प. शाळा नं. २ बुर्ली
ता. पलूस यांचेकडून,

जि.प. शाळा नं. २ बुर्ली ता. पलूस यांचेकडून दाखला देणेत येतो की, मौजे बुर्ली येथे सन २०१९-२० मध्ये ऑगस्ट महिन्यात आलेल्या महापूर कालावधीत आर्टस, सायन्स ॲण्ड कॉमर्स कॉलेज मधील प्राचार्य, प्राध्यापक शिक्षक शिक्षकेतर सेवक, NSS, NCC विद्यार्थी विद्यार्थीनी यांनी आमच्या शाळेतील व शाळेच्या परिसरातील स्वच्छता करणेसाठी शाळेतील शिक्षकांसह चांगले सहकार्य केले व शाळा परिसर स्वच्छ करणेसाठी सहभाग घेतला. या सर्वांचे मनापासून खूप आभार.

जि. प. शाळा नं. २ बुर्ली * स्थापना १९४८ * ता.पलूस, जि. सांगली

मुख्याध्यापक
जि.प. शाळा नं. २ बुर्ली
ता. पलूस, जि. सांगली.